| VOL- X | ISSUE- VI | JUNE | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# भावसंबंधाचा उत्तम नमुना 'शिदोरी'

**प्रा. श्रीकांत दत्तात्रय तनपुरे**
विभाग प्रमुख व सहाय्यक प्राध्यापक
मराठी विभाग, श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा
ता.जामखेड, जि.अहमदनगर,
मेल आयडी. tanpureshrikant@gmail.com

## प्रस्तावना

शिदोरी ही कादंबरी नूतन प्रकाशन, पुणे या प्रकाशन संस्थेने १९८० ला प्रकाशित केली. 'विद्यालयीन जीवनावरील एका निर्व्याज व विशुद्ध प्रेमाच्या सफलतेने साकारलेली कादंबरी' असे म्हणता येते. पौगंडावस्थेतील 'श्री'च्या म्हणजे कादंबरीतील नायकाच्या भावविश्वात निर्माण झालेली पोकळी व ती भरून काढणारी, त्याला जीवनावर प्रेम करायला शिकवणारी 'सुधा गाडगीळ' यांच्यातील भावसंबंधावर आधारित ही कादंबरी आहे. या कादंबरीत श्री व सुधा दोघेही प्रातिनिधिक आहेत एवढच नव्हे तर 'सुधा ही एक व्यक्ती नाही, प्रवृत्ती आहे जीवनावर प्रेम करायला शिकवणारी' असही लेखकाने सुरूवातीलाच अगत्यपूर्वक सांगून टाकलं आहे. लेखक सुरुवातीलाच सांगतो, "ह्या पुस्तकाच्या वाचनानं कोवळ्या बालवयातल्या असंख्य श्रींना ह्या प्रवृत्तीची ओळख व्हावी, आणि त्यांचंही जीवन पुष्प फुलायला, सुगंधित व्हायला अंशतः तरी मदत व्हावी एवढाच ह्या लिखाणाचा हेतू आहे." लेखक सुरुवातीलाच असे घोषित करतो. तसेच ही कादंबरी आत्मचरित्रात्मक असल्याचे जाणवते. लेखकाच्या शालेयजीवनातील बहुतांश साम्य या कादंबरीत आलेले आहे.

'शिदोरी' या कादंबरी विषयी श्रीराम कृष्ण बोरकर म्हणतात, "सहवासजन्य प्रेमाचा हा प्रभाव लेखकाने सरळ, सुगम शैलीत हळुवार मनानं रेखाटला आहे. उत्तम संस्काराचं अनिवार्य महत्व आणि त्यायोगे होणारी व्यक्तित्वाची बांधेसुद जडण-घडण लेखकास इथे अभिप्रेत आहे."[१] लेखकाने सहवासजान्य निर्मळ, निस्वार्थ प्रेमाचा प्रभाव कादंबरीत दर्शवला आहे. दोघांमधील 'बहीण-भावा'च्या नात्याचे पावित्र्य लेखकाने यथोचित मांडले आहे. दोघेही निष्पाप वागतात. तरीही एक प्रश्न अनुत्तरितच राहतो. दोघांना एकमेकांबद्दल जे तीव्र आकर्षण वाटतं त्याचं नेमके स्वरूप कोणते ? त्या उत्कट प्रेमाची निश्चित कारणे व संगती कोणती?

## शिदोरी कादंबरीतील कथानक

कादंबरीची सुरुवात 'गावा बाहेरच्या शंकराच्या देवळाजवळच्या तळ्याच्या पाळीवर श्री बसला होता.' या वाक्याने होते व श्रीची कहाणी सुरू होते. शिदोरी कादंबरीतील नायक श्री हा दहावीत आहे तो कठीण परीस्थित शिक्षण घेत आहे घरची परिस्थिती हालाकीची आहे. तो दहावी पर्यंत मार्काने वर्गात पहिला येत असे. तो कविता देखील करतो. 'श्री कविता करतोस का रे तू ?' बाईनी विषय बदलला. 'हो, पण तुम्हाला कसं कळल ?' श्रीनं अश्चर्यान विचारलं.' (शिदोरी पान क्र.४१) लहान वयातच श्रीची प्रतिभा शक्ती कविता करू लागलेली आहे. श्री विद्यालयीन शिक्षण घेत असताना सुधा गाडगीळ नावाच्या शिक्षिकेशी आलेले प्रेमळ व जीव्हाळ्याचे संबंध या कादंबरीत प्रामुख्याने आलेले दिसते. या संबंधाचे रुपांतर बहिण – भाऊ या नात्यामध्ये झालेले पाहायला मिळते. सुधा व श्री एकमेकांशी खूप मैत्रीपूर्ण राहतात. श्रीला स्कॉलरशिप मिळावी म्हणून खरे सर संस्कृत विषयची रात्रशिकवणी घेऊन श्रीला मदत करतात. श्रीची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे रात्र शिकवणीला जायला त्याच्याकडे घरात दुसरा कंदील नाही. या कंदिलाची सोय सुधाच्या माध्यमातून होते. सुधाही खरे सरांच्या संस्कृतच्या तासिकेला येत असे.

नायक श्री हा खेड्यातील राहणीमुळे आणि घरच्या गरिबीमुळे काहीसा एकलक्कोंडा व पुस्तकात रमणारा आहे त्याला कोणी मित्र नाहीत. संस्कृतचे खरे शास्त्री त्याला संस्कृतची खाजगी शिकवणी देतात आणि सुधा गाडगीळ हिला पण पदवी परीक्षेसाठी संस्कृतची शिकवणी सुरू

केल्यामुळे श्री व सुधा यांचा परिचय होतो. सुधा वयाने जरा मोठी असल्यामुळे बहिणीच्या दृष्टीने त्याच्याशी वागणूक ठेवते त्याने लिहिलेल्या कवितातला सूर समजून घेते त्या दोघांचे एकमेकांविषयीचे निर्व्याज विशुद्ध प्रेम हे फक्त कादंबरीपुरतेच मर्यादित आहे. सत्यसृष्टीत पाहायला मिळणे फार दुर्मिळ आहे. दिवाळीच्या सुट्टीत सुधा पुण्याला आई वडिलांकडे रहायला गेल्यावर झालेल्या ताटातूटीमुळे श्री ला सुधाबद्दलच्या भावनांची तीव्रता कळते. सुट्टीनंतर एका लहानशा प्रसंगातून सुधा त्याला स्त्री-पुरुष संबंधाची ओळख करून देते संस्कृतची परीक्षा देण्यासाठी ते दोघे जिल्ह्याच्या ठिकाणी जातात तेव्हा सुधाची हुकुमत चालू असते. काही दिवसानंतर सुधाचे लग्न ठरते तेव्हा तिच्यापेक्षा लहान असणारा श्री तिला चांगला उपदेश करतो. दोघांमधला स्नेहभाव दुरावणार याची कल्पना असते. त्याचा निरोप घेऊन बसमध्ये बसण्यापूर्वी सुधा त्याच्या हाती पन्नास रुपये एका पाकिटात घालून देते. बस निघून गेल्यावर श्री ते नोटांचे कागद तळ्यात टाकून देतो.

या कादंबरीच्या कथानकाबद्दल सौ. उज्वला पिपळखेर म्हणतात, “असे हे सोज्वळ कथानक मोजक्या व्यक्ती व घटना यांच्या गुंफणीतून समर्थपणे व्यक्त झाले आहे. किशोर वयातल्या मुलामुलींना वाचनीय वाटावी अशी कादंबरी आहे हेच शिदोरीचे यश मानायला हवे.”[२]

**शिदोरी कादंबरीतील व्यक्तिरेखा**

**श्री**

‘श्री’ हा शिदोरी कादंबरीतील नायक आहे. श्री हे मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. सावळ्या वर्णाचा, दिसायला सर्वसाधारण अंगानं काटकुळाच पण बुद्धीन फार तल्लख आणि मनानं तीव्र संवेदनक्षम असा हा श्री शालेय जीवनातच आहे, हा श्री शाळेत खूप हुशार आहे, तो दहावीला आहे दहावीपर्यंत वर्गात प्रथम असे, शाळेत अभ्यासात तो सर्वांच्या पुढे आहे, त्याला वाचनाची खूप आवड आहे तो गावातील सार्वजनिक वाचनालयात सदस्य आहे, शिवाय सर्व शिक्षकांचा तो आवडता विद्यार्थी आहे, खेळण्याची आवड नाही, त्याला मित्र नाहीत, त्याला चित्र काढण्याची आवड आहे, एकट्याने दूरवर फिरत जाण्याची त्याला आवडते अशा व्यक्तिमत्त्वाचा श्री कादंबरीत लेखकाने दर्शवला आहे.

श्री ची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे रात्र शिकवणीला जाण्यासाठी त्याच्याकडे कंदील नाही, सार्वजनिक वाचनालयातील पुस्तके घरी वाचनासाठी घेऊन येण्यासाठी एक रुपया फी भरावी लागते ती न भरता ओळखीच्या सराकडून पुस्तके घेऊन तो येत. तसेच मॅट्रीक नंतरच्या शिक्षणासाठी वडील खर्च करू शकत नाहीत. त्यासाठी चांगली स्कॉलरशिप मिळाली पाहिजे त्यासाठी तो प्रयत्न करताना दिसतो. श्रीला नाटक पहायची आवड आहे. शाळेत एक नाटक कंपनी नाट्य प्रयोग करणार होती त्यासाठी त्यांनी तिकीट ठेवले होते. ते तिकीट काढून नाटक बघण्यासाठी त्याच्या कडे पैसे नाहीत. अशा परिस्थितीत श्री शिक्षण घेत आहे.

**सुधा**

बालपणात चांगले संस्कार होणं हा एक नशिबाचा भाग असतो. आणि प्रत्येकजण निरनिराळ नशीब घेऊन आलेला असतो. कादंबरीत आलेला श्री खरोखर भाग्यवान आहे. त्याची पौगंडावस्थेतील भावनिक गरज भागवणारी आणि त्याच्या भावविश्वात निर्माण झालेली पोकळी भरून काढणारी सुधा गाडगीळ नावाची व्यक्तिरेखा कादंबरीत दिसते. सुधा पुण्यात राहणारी मुलगी नोकरीच्या निम्मित्ताने श्रीच्या शाळेत शिक्षिका म्हणून येते. त्या गावात सुधाच्या वडिलांनीही नोकरी केलेली होती व काही दिवस त्या गावात राहिले होते. सुधा ही पुण्यात शिकली असली तरी ती मध्यम वर्गातीलच होती.

सुधाची आणि श्रीची मैत्री चांगली होती. संस्कृतच्या तासिकेला खरे सरांकडे ते दोघे सोबतच जात. त्या दोघांची एवडी मैत्री होती की, श्रीच्या त्या शिक्षिका असल्या तरी श्री ते दोघे असताना सुधाला सुधा म्हणून हाक मारत. श्री च्या आयुष्यातील एकलकोंडेपणा दूर व्हावा म्हणून ती प्रयत्न करत असे.

**खरे सर**

खरे सर शाळेत संस्कृत शिकवतात. श्रीची प्रगती पाहून सरांना नेहमी वाटे की ह्या विद्यार्थ्यांनं मेहनत घेतली तर हा मॅट्रीकला ‘जग्गनाथ शंकरशेट स्कॉलरशिप’ नक्की मिळेवेल. म्हणून खरे सर श्रीची संस्कृत विषयाची रात्र शिकवणी घेत तेही विना फी. तसेच ते सुधाचेही तास घेत. खरे सर या व्यक्तिरेखेतून निस्वार्थ शिक्षक म्हणून चित्रित झालेले

दिसतात. विद्यार्थी घडला पाहिजे व आपले विषयज्ञान वाढले पाहिजे या उद्दात्त हेतूकडे पाहणारी ही व्यक्तिरेखा आहे.

**रमण देसाई**

रमणच्या वडिलांचे गावात किराणा दुकान होतं गावातील तेच एकमेव मोठं दुकान होतं, आणि ते चांगलं चालत असे. मॅट्रीक पास झाल्यावर रमण दुकानात मदत करीत असे. रमण श्री पेक्षा पाच सात वर्षांनी मोठा आहे. रमण आणि सुधा गाडगीळ हे पुण्याला बी.ए. करत असताना एकाच कॉलेजमध्ये आणि वर्गात होते. त्यामुळे तो सुधाला पूर्वीपासून ओळखत होता. रमण श्रीला एक दिवस सुधा विषयी बरच काही सांगतो. रमण सुधा विषयी सांगतो, 'सुधा गाडगीळ ही खास चांगल्या चालीची मुलगी नाही. तुला उगाच कशात गुंतवील आणि तुझ्या अभ्यासाचा बट्ट्याबोळ होईल.' असे तो श्रीला सांगतो व आणखी कॉलेजमध्ये घडलेल्या काही गोष्टी तो सांगतो. परंतु त्या गोष्टीत काही तथ्य नसते.

अशाप्रकारे श्री, सुधा गाडगीळ, खरे सर, रमण देसाई इ. प्रमुख व्यक्तिरेखा कादंबरीत आलेल्या आहेत. श्री व सुधा या दोन व्यक्तिरेखांच्या भोवती कादंबरी अधिक भिरताना दिसते.

**शिदोरी कादंबरीतून चित्रित होणारे समाजजीवन**

शिदोरी या कादंबरीच्या प्रस्तावनेत लेखक म्हणतात, 'या वयात शेजारच्या जगाशी नीट जुळवून घेण्याचं कसब जमलं नाही तर पुढील आयुष्यात अशा मुलांची व्यक्तिमत्त्व खुजी—खुरटी बनतात.' (शिदोरी चार शब्द) या वयात म्हणजे बालवयात समाजाशी मुलांनी जुळवून घेतले पाहिजे. समाजात वावरता आले पाहिजे, समाजाशी वावर ठेवला पाहिजे तरच मुलांचे व्यक्तिमत्त्व सक्षम बनते असे लेखक येथे नमूद करतात. त्याच्या वरती एक सामाजिक संस्कार उत्तम होतो. श्री एका ठिकाणी म्हणतो, "पुस्तकं त्याची मित्र बनू शकत होती. निसर्ग त्याला जवळचा वाटत होता. पण हे सगळे अबोल मित्र. एकही माणूस मात्र आसपास असं नव्हतं की ज्याच्याजवळ ह्यातलं काही मनमोकळेपणानं बोलता येईल." (शिदोरी पान क्र.६) पुस्तके, निसर्ग हे जरी मानवी मनाला समाधान देत असली तरी समाजातील माणूस हा घटक माणसासाठी अत्यंत गरजेचा आहे. त्याला त्याच्या भावना सुख दुःख सांगण्यासाठी ऐकण्यासाठी माणूस महत्त्वाचा असतो.

पूर्वी एकमेकांचा एकमेकांवर खूप विश्वास असायचा एकमेकांना मदत केली जात असे. तसा एक विश्वास होता की आपल्याला हमखास मदत मिळेल. असाच विश्वास सुधाला होता ती आपल्या वडिलांना नोकरी निमित्त ज्या गावात जायचे आहे त्याविषयी म्हणते, "बरं ते गाव आपण सोडलं असलं तरी मला काही परकं नाही. सगळी तर ओळखीची आहेत. कर्वेकाका आपल्या ओळखीचे आहेत. त्यांच्याकडे राहीन म्हणते, चालेल ना ?" (शिदोरी पान क्र. १७) सुधाला विश्वास होता की, कर्वेकाका आपल्याला मदत करतील व सुधाच्या वडिलांनाही विश्वास होता की त्या गावात आपली मुलगी सुरक्षित राहील. अशी विश्वासार्हता पूर्वी समाजात पाहायला मिळत होती. एकमेकास मदतीचा हात पुढे केला जात असायचा.

शिकवणीहून रात्री घरी जाताना श्री लगेच निघाला असताना सुधा म्हणते, "श्री, थांब. तू आधी मला घरी पोचव आणि घरी जा. चालेल ना ? काही झालं तरी मी मुलगी आहे आणि आता रात्रीचे दहा-साडेदहा झाले आहेत. मला एकटीला घरी जायची भीती वाटते." (शिदोरी पान क्र. ३०) समाजामध्ये मुली अशी भीती बाळगून राहतात हे इथे प्रतीत झालेले दिसते.

कादंबरीतील नायक श्री म्हणतो, "बाई माझ्या हुशारीचं लोक कौतुक करतात पण मला मात्र ही हुशारी शापासारखी वाटते. लक्ष्मी आणि सरस्वती एकत्र नांदत नाहीत असं म्हणतात. पण आजकालच्या ह्या महागड्या शिक्षणाकडे पाहिलं की वाटतं लक्ष्मीचा थोडासा तरी पाठींबा असल्याशिवाय सरस्वतीही आमच्याकडे यायला तयार होत नाही. अशा परिस्थितीत बुद्धीमत्तेबरोबर दारिद्य देणं हा दैवाचा क्रूर विनोद नाही वाटत तुम्हाला ?" (शिदोरी पान क्र. ४९) सामाजिक जीवन जगत असताना आर्थिक परिस्थिती अत्यंत महत्त्वाची ठरते असे नायक येथे प्रतीत करतो. आपल्याकडे भरपूर ज्ञान आहे परंतु पैसा नसेल तर त्या ज्ञानाचा फायदा करून घेता येऊ शकत नाही अशीही परिस्थिती येऊ शकते.

सुधा श्री ला नावाने हाक मारायला लावते श्रीही मान्य करतो परंतु तो म्हणतो मी शाळेत व गावात कोठे भेटलीस तर बाई म्हणून हक मारणार व एकटी असलीस की सुधापण त्याची ही सूचना मान्य करते. 'सुधालाही ही सूचना पटली त्याचं कारण दुसरंच होतं. सुधा त्याच्याहून मोठी होती. लग्नाच्या वयाची होती. सुधाला माहित होतं की माणसाचं

सार्वजनिक मन फार विषारी असतं. ते भलत्याचा भलता अर्थ लावतं.' (शिदोरी पान क्र.६४) तिला माहित आहे जगात शब्दाचा, नात्यांचा आणि बोलण्याचा विपरीत अर्थ चटकन लावला जातो. असेच गावात एक नाटक होते हे नाटक शाळेतच होते चार रुपये तिकीट होते सुधाने तिकीट घेतलेही होते परंतु ती नाटकाला जात नाही. कारण श्रीला ती सोबत घेऊन नाटक बघू शकत नव्हती, याला कारण ती समाजाला धरते ती म्हणते, "पण मी असं तुला बरोबर घेऊन नाटक पाहणं लोकांच्या डोळ्यांत आलं असतं. लोकांनी वाटेल तो अर्थ लावला असता, त्यावर चर्चा झाली असती. किती चमत्कारिक आहे आपला समाज." (शिदोरी पान क्र.७१) सुधाला या बाबत समाज विचित्र वाटतो.

अशाप्रकारे या कादंबरीतून सामाजिक जीवन, समाजात वावरणाऱ्या समाजमनाची मानसिकता, समाजबंधन इ. चित्रण कादंबरीत आलेले दिसते.

**शिदोरी कादंबरीतून चित्रित होणारे नातेसंबंध**

शिदोरी या कादंबरीत विविध नातेसंबंध आलेले दिसतात. या कादंबरीत 'श्री' हे मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. म्हणजेच श्री हा नायक आहे. या श्रीला आई, वडील, भाऊ, बहिण, मित्र हे सर्व आहेत. परंतु निवेदक सुरूवातीला सांगताना म्हणतो , "श्रीला भाऊ होता, बहिण होती. पण एकंदरच घरातलं सारं वातावरण त्याला जुजबी वाटे. दिलखुलासपणे हसल्याचं, मनमोकळे रडल्याचं किंवा तासन तास गप्पात रंगून गेल्याचं श्रीला कधीच आठवत नव्हतं." (शिदोरी पान क्र. २) कादंबरीतील नायकाला आई, वडील, भाऊ, बहिण सर्व आहेत हे सर्व त्याच्यावर प्रेम करतात परंतु घरात दिलखुलास गप्पा होत नाहीत, मनमोकळेपणा नाही असे त्याला जाणवते. शिदोरी कादंबरीत श्री ची शाळेतील शिक्षिका सुधा गाडगीळ आणि श्री यांच्यात चांगली मैत्री होते. खरे सरांच्या संस्कृतच्या रात्र शिकवणीला जाताना श्री व सुधा एकत्र जात. सुधा श्री ची सर्व परिस्थिती समजून घेते व त्याला हवी असणारी सर्व मदत करते. पुढे पुढे त्यांचे नाते घट्ट बनतात व एकमेकाचे बहिण भाऊ होतात. श्री म्हणतो, "वा बाई , आता तुम्हाला मला ताई म्हणावं लागणार !' 'म्हणावं लागणार का म्हणतोस , काही हरकत आहे का श्री ?" (शिदोरी पान क्र. ५५) अशा प्रकारे या दोघांचे नाते बनलेले दिसते.

सुधा दिवाळीच्या सुट्ट्यात तिच्या गावाकडे म्हणजे पुण्याला जाते. सुधाला भाऊबीजेच्या दिवशी श्रीची आठवण येते. यातून लेखकाने आपली नात्यातील पारंपारिकता दर्शवलेली दिसते. 'भाऊबीजेच्या दिवशी सुधाला श्रीची अतिशय तीव्रतेनं आठवण झाली. जेवताना तिला ठसका लागला आणि अपोआप मनात आलं नक्की श्रीनं आठवण काढली असणार !' (शिदोरी पान क्र.८७) सुधाला वाटलं श्री आज इथे हवा होता. चांगली भाऊबीज झाली असती. अशी भाऊ बहिणीच्या नात्याची ओढ इथे दर्शवलेली दिसते.

**शिदोरी कादंबरीतून चित्रित होणारी नैतिकता**

'शिदोरी' कादंबरीत अनेक ठिकाणी नैतिकतेची जाणीव दिसून येते. कादंबरीतील नायक श्री म्हणतो, "पण पुढचं वर्ष अकरावीचं होतं. साऱ्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांशी झुंज घ्यायची होती. चांगले गुण मिळावायचे होते. खरोखरीच काहीतरी चांगले गुण मिळाले नाही तर पुढील शिक्षणाची आशा नव्हती. कॉलेजचा खर्च वडिलांना परवडणारा नव्हता." (शिदोरी पान क्र. ५) श्री ने वडिलांप्रती दर्शवलेली ही नैतिकता खूप प्रेरक दिसते. चांगले मार्क मिळवून शिष्यवृत्ती मिळवून स्वतःचे शिक्षण स्वतः पूर्ण करायचे वडिलांना आर्थिक ताण होऊ द्यायचा नाही. श्री ला 'जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप' मिळावी म्हणून संस्कृतचे शिक्षक खरे सर रात्री शिकवणीला बोलावतात. श्री म्हणतो 'पण सर-' श्री ची अडचण लक्षात आली होती श्रीच्या मनात फी चा प्रश्न निर्माण झालता. यावर खरे सर म्हणतात, "फी च्या पैशाची काळजी तू नाही करायची, श्री तुझं काम शिकवणीला यायचं एवढंच आहे. तुला मी शिकवणाराय ते फी मिळावी म्हणून नाही, शिकवण्यातला आनंद मिळावा म्हणून." (शिदोरी पान क्र.७) शिक्षकाची विद्यार्थ्याप्रती असणारी नैतिकता येथे दिसून येते. आजच्या काळात ही नैतिकता हरवत चाललेली दिसते. पूर्वी शिक्षक आनंद मिळावा, विद्यार्थ्याला फायदा व्हावा म्हणून शिकवणी घेत असत. आता असे दिसून येत नाही.

'अंगाला लावायला साबण घरी आणणं बंद झालं होतं. गहू महाग पडतात म्हणून ज्वारी आणायला सुरुवात झाली होती. 'गव्हाची पोळी करायची तर तेलाचा खर्च होतो, भाकरीला तेही लागत नाही' हा आईचा उदगार श्रीनं ऐकला होता.' (शिदोरी पान क्र. ८) श्री च्या घराची परिस्थिती नाजूक होती हे यावरून जाणवते. शिकवणीला रात्री जायला कंदील लागेल तो कंदील श्रीकडे नाही. ही बाब खरे सरला कशी

सांगावी व दुसरा कंदील उपलब्ध करून द्या असेही श्री घरी सांगू शकत नाही कारण परस्थिती नाजूक आहे. याचे भान शालेय शिक्षण घेणाऱ्या श्रीला आहे.

खरे सर एक दिवस शिकवणी घेणार नव्हते हे त्यांनी सुधाला सांगितले होते आणि सुधाने श्रीला तरीही रात्री गप्पा मारण्यासाठी घरी बोलावले. ठरल्या प्रमाणे श्री रात्रीच जेवण झाल्यावर निघताना म्हणतो, “आई मी सरांकडे शिकवणीला जातो असं म्हणून तो वही घेऊन बाहेर पडला. रस्त्याला लागल्यावर मात्र त्याला चुकल्याचुकल्यासारखं वाटू लागलं.” (शिदोरी पान क्र. ३७) आपल्या आईला खोटं बोलल्याची जाणीव त्याला बोचत होती. आपण खोटं बोललं नाही पाहिजे ही जाणीव लहान श्रीला होती. अशाप्रकारे नैतिकतेचे अनेक प्रसंग कादंबरीत चित्रित झालेले दिसतात.

**समारोप**

लेखक लक्ष्मण यांच्या शिदोरी कादंबरीत मित्र-मैत्रीण, भाऊ-बहिण, शिक्षक-विद्यार्थी, आई-वडील यांच्यातील भावसंबंध कादंबरीतील पानापानात दडलेला दिसतो. लेखकाने हा भावसंबंध वाचकांसमोर मांडलेला आहे.

शिदोरी ही कादंबरी लेखक लक्ष्मण लोंढे यांचे आत्मचरित्र असल्याचे जाणवते, लेखकाने असे कोठे म्हणलेले नसले तरी लेखकाचे शालेय जीवन आणि कादंबरीतील नायक श्री याचे जीवन यामध्ये साम्य आढळते.

**साधनसूची**

१. लोंढे लक्ष्मण, शिदोरी, नूतन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, सप्टेंबर १९८०.

**संदर्भ**

१. म. टा., शिदोरी, श्रीराम कृष्ण बोरकर, दि. १८/०१/१९८१.
२. लोकप्रभा, अनुभवाचे विविध पैलू दर्शवणारी पुस्तेके, उज्वला पिपळखेर, दि. २५/०१/१९८१.